संपादकीय

चला आखूया लक्ष्मणरेषा!

रामायणात लक्ष्मणाने सीतेच्या सुरक्षेसाठी लक्ष्मणरेषा आखली होती. आज ही लक्ष्मणरेषा सगळ्याच स्त्रियांनी आपल्याभोवती आखायची आहे, जेणेकरून कोणत्याही वासनांध रावणाला ती अडवू शकेल. आज कायदे, पोलीस, सरकारी योजना आपल्या मदतीला तत्पर आहेत. फक्त आपण भीती, लाज, संकोच, बदनामी, मौन, शरणागती या स्वअडथळ्यांवर मात करायची आहे. आपल्या मुला-मुलींना या बाबतीत प्रशिक्षित करायचे आहे. मुलांनाही अशावेळी मदतीला धावून जाण्याची शिकवण देणे गरजेचे आहे. आपल्या स्वभावात धैर्य, समयसूचकता, स्पष्टवक्तेपणा, अन्यायाचा प्रतिकार आणि स्वाभिमान या अस्त्रांचा समावेश करून पोलीस, कायद्याच्या मदतीने आपली लक्ष्मणरेषा आपल्यालाच आखायची आहे. देवीची उपासना करताना महिषासुरमर्दिनीची कथा केवळ मनोरंजनासाठी किंवा डोके टेकवण्यासाठी वाचायची नाही, तर प्रतिकारासाठी आपल्या वापरात नसलेली अस्त्रे परजून ठेवायची आहेत. केवळ नऊ दिवस नऊ रंगांच्या साड्या, उपास, ओटी, गरबा यात गुंतून न राहता पुढाकार घेऊन कृती करून दाखवण्याची वेळ आली आहे. नवरात्रात देवीच्या नऊ रूपांची उपासना करताना आजच्या सक्षम स्त्रीने कालीमातेची शक्ती काही अंशी अंगीकारली तर हे नवरात्री पूजन सुफळ संपूर्ण होईल. रक्षणासाठी कुणी येण्याची वाट बघण्यापेक्षा गंजत पडलेली धिटाई, अन्यायाचा प्रतिकार, स्वाभिमान ही अस्त्रे नवरात्रात परजून ठेवायची आहेत. कायद्याच्या मदतीने आपल्या अस्त्रांनिशी लक्ष्मणरेषा आखायची आहे; जेणेकरून कोणताही रावण रेषेपलीकडेच अडवला जाईल. कोलकाता, बदलापूर आणि अशाच काही छोट्या-मोठ्या शहरांमध्ये स्वातंत्र्यदिनाच्या काही दिवस आधी घडलेल्या घटना आताच्या क्षणी आम्ही कदाचित विसरलो असू. कारण त्यानंतर आम्ही उत्साहाने झेंडावंदन केले. स्वतंत्र भारताचे प्रतीक असलेला हा तिरंगा नक्की कोणत्या स्वातंत्र्याचे प्रतिनिधित्व करतो हे भारतमाताच जाणे. पण ७७ वर्षांच्या स्वतंत्र भारतात हा तिरंगा दिमाखाने फडकत होता, हे मात्र खरे. त्यानंतर गौरी-गणपतीची धामधूम संपून आता नवरात्र उत्सवाला सुरुवात झाली आहे. या सगळ्या उत्सवी वातावरणात कोलकाता आणि बदलापूरमधील महिला शोषणाच्या घटनांचे नेहमीप्रमाणेच विस्मरण झाले. महिलांच्या लैंगिक छळाची परंपरा फार जुनी आहे. ज्या बलात्काराच्या घटना आपल्या समोर येतात त्यापेक्षा किती तरी पटींनी जास्त प्रमाणात असे प्रसंग घडत असतात. फक्त ते उजेडात येत नाहीत म्हणून कळतही नाहीत. पण त्यामुळे कुठे काय बिघडते? या वर्षी आपण ७७ वा स्वातंत्र्य दिन साजरा केलाच की एका महिला पंतप्रधानांनी १४ वर्षे आपल्या देशाची धुरा सांभाळली आहे. सध्या आणि याआधीही राष्ट्रपतीपदाचा मान महिलेला मिळाला आहे. म्हणजेच या ७७ वर्षांमध्ये महिलांच्या जीवनपद्धतीत झालेला सकारात्मक बदल लक्षात घ्यायला हवा. भारतीय मुलींची ऑलिम्पिकमधील कामगिरी, लष्कर, उद्योग व्यवसायातील भरारी या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करायला हवे आणि आता तर नवरात्रामुळे देवीपूजनाइतके महत्त्वाचे दुसरे काही असूच शकत नाही. असेच आहे ना वास्तव? तरीसुद्धा एक प्रश्न सगळ्या मैत्रिणी, माता, भगिनींना विचारायचा आहे.

तुकोबांची शब्दरत्ने- १७३४

न मिळो खावया न वाढो संतान
परि हा नारायण कृपा करो -२

समाजसेवेच्या ध्येयाकडे जात असतांना खायला मिळाले नाही किंवा संतान वाढली नाही तरी चालेल पण कर्तव्यापासून आपण परावृत्त होता कामा नये. आपला दृढनिश्चय टिकून राहावा, या दृष्टीने महाराजांनी नारायणाच्या कृपेची अपेक्षा केली. या अनुषंगाने बोलतांना ते म्हणतात, न मिळो खावया न वाढो संतान। परि हा नारायण कृपा करो।।नारायणाकडील तुकाराम महाराजांची मागणी आणि आपली मागणी यांची तुलना करून पाहिले तर त्याांची मागणी जनकल्याणासाठी आहे व आपली मागणी स्व कल्याणासाठी आहे, हे आपल्या लक्षात येते. इतरांसाठी मागण्यासाठी प्रथम स्वतून बाहेर पडावे लागते. मी मध्ये अडकलेला जीव नारायणावर खरी श्रध्दा नसतांनाही खूप मागण्या करतो. त्याांच्या ह्या मागण्या सत्ता,संपत्ती, सौंदर्य आदी संपणाऱ्या बाबीशी संबंधित असतात. त्याांने थोडेफार इतरांसाठी मागीतले तरी त्याांचे मागणे इतरांसाठी घातक असते. कारण ... चे वाटोळे व्हावे, त्याांचे नुकसान व्हावे, त्याांला अपयश यावे अशा प्रकारची मागणी असते. दुसऱ्यांच्या भल्यासाठी मागायला मन मोठं लागतं. अशा मोठ्या मनाच्या माणसांची संख्या कमी होत चालली आहे. मानवता हरवणाऱ्या लोकांच्या संख्येत आपला क्रमांक कधीच लागू नये.

''जय जय राम कृष्ण हरी''

डॉ. विजयकुमार पं.फड
श्री माउलीनगर जालना,
भ्रमनध्वनीः 9422216448

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ ताब्यात घेणार-आ.प्रशांत बंब

गंगापूर तालुक्यात प्रचाराचा शुभारंभ;, नऊ हजार कामगारांना संसार भांडी वाटप.

गंगापूर (प्रतिनिधी.) - येत्या मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही असे आ. प्रशांत बंब यावेळी म्हणाले. जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या शिक्षकांविरोधात मी आवाज उठवला त्या शिक्षकांना वैयक्तिक राजकारणासाठी पाठीशी घातले मला विद्यार्थी घडवायचा आहे. त्या उलट यांना पैसे कमवण्यासाठी शिक्षण संस्था वाचवायचे आहेत. परंतु लक्षात ठेवा माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या गोरगरीब जनतेला कोणी भूलथापा देऊन फसवेपणा करत असेल तर ते मी कदापी खपवून घेणार नाही. असा इशारा आ.प्रशांत बंब यांनी दिला. गंगापूर तालुक्यातील लासुर स्टेशन येथून जवळच असलेल्या आरापूर शिवारात शनिवार रोजी गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील पाच महत्त्वांच्या रस्त्यांची दर्जोन्नतीकरून त्यांना हायब्रीड एनुईटी मॉडेल (एच ए) मधून सात अब्ज रुपये मंजूर करून घेऊन या रस्त्यांच्या कामाच्या भूमिपूजन व नऊ हजार कामगारांना संसार भांडे वाटप करण्यात आली त्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आ.बंब म्हणाले की माझ्या पंधरा वर्षाच्या काळात मी केलेली कामे माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून गावागावात प्रत्येक ग्राम पंचायतला वाटप करणार आहे. परंतु तुम्ही १७ वर्षापासून मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार आहात त्या काळात तुम्ही केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर मांडा.येत्या मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले.गंगापूर तालुक्यातील कसाबखेडा फाटा - पोटूळ -डोमेगाव ढोरेगाव रस्ता - एकुण लांबी २३ किमीसाठी १६४.८७ कोटी रुपये, देवगाव रे कायगाव टोका - एकुण लांबी ३३ किमी २२९ कोटी रुपये, माळीवाडा - आसेगाव आंबेगाव - एकलेहरा

- कासोडा - आंबेलोहळ रस्ता एकुण लांबी १३ किमी ९१.४२ कोटी रुपये, काटेपिंपळगाव - वजनापूर - आंबेलोहळ - तुर्काबाद - लिंबेजळगा रस्ता एकूण लांबी १६ २० किमी.११८.१६ कोटी रुपये तर खुलताबाद तालुक्यातील चिकलठाण - लोणी - बाजार सावंगी - खुलताबाद फुलंब्री रस्ता एकुण लांबी १४.६० किमी ९५.५७ कोटी रुपये अशा एकुण सात अब्ज रुपये खर्च करून होणाऱ्या १०० किमी रस्त्याच्या अंतराच्या कामाचे भूमिपूजन आ.बंब यांनी केले.

धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणी आंदोलन

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) -अनुसूचित जमातीचे आरक्षणाची अंमलबजावणी आणि खिल्लारे कुटुंबीयाने अवैधरीच्या काढलेल्या धनगर जमातीच्या दाखल्यांची व्हॅलिडीटी रद्द करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील आदिवासी जात पडताळणी कार्यालयासमोर दि. ७ ऑक्टोबर पासून धनगर समाजाचे कार्यकर्ते आमरण उपोषण करणार आहेत.

७० वर्ष प्रस्थापितांनी आणि आदिवासींनी ते आरक्षण रोखून धरलेले आहे या विजयादशमीला प्रस्थापितांच्या तावडीतून त्या आरक्षण सोडून विजयाचा दसरा साजरा करावयाचा आहे तरी सर्व धनगर समाज घटकातील सर्वांनी आदिवासी जात पडताळणी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष रवी वैद्य, उपाध्यक्ष विलास गायकवाड, व आंदोलनकर्ते कारभारी नजन, सुधाकर वैद्य, अंबादास गायकवाड, तुळशीदास गायकवाड, गणेश वैद्य, परमेश्वर वैद्य, सुरेश वैद्य, सखाराम भोजने व समस्त आंदोलनकर्ते मंडळींनी केलेले आहे.

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारी- पालकमंत्री अब्दुल सत्तार

तीर्थयात्रेसाठी ८०० यात्रेकरू विशेष रेल्वेने अयोध्येकडे रवाना

सिल्लोड (प्रतिनिधी) :-तीर्थयात्रा ही ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारी बाब असते. शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु करून ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, अशा शब्दात राज्याचे अल्पसंख्यांक औकाफ, पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी रविवारी अयोध्येकडे रवाना झालेल्या तीर्थयात्रेकरुंना शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत आज छत्रपती संभाजीनगर येथून ८०० जेष्ठ नागरिकांना घेऊन जाणारी जिल्हयातील पहिली रेल्वे अयोध्येकडे रवाना झाली. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते व गृह निर्माण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर या यात्रेकरुंना निरोप देण्यात आला. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी हिरवा झेंडा दाखवून रेल्वे मार्गस्थ केली.यावेळी गृह निर्माण मंत्री अतुल सावे, आमदार विक्रम काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे, सहायक आयुक्त पांडुरंग वाबळे उपस्थित होते.आज 'जय श्रीराम जय जय श्रीराम' च्या जयघोषात ८०० जेष्ठ नागरिक तीर्थ दर्शनासाठी विशेष रेल्वेने मार्गस्थ झाले.पालकमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत जिल्ह्यातून ही पहिली भाविकांची रेल्वे अयोध्येसाठी रवाना होते आहे. श्रीरामाचे दर्शन घेण्याची ही संधी या यात्रेमुळे आपल्या जिल्ह्यातील जेष्ठांना मिळते आहे. जेष्ठांना आनंद देणारी ही योजना आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून राज्य शासनाने सुरू केलेल्या योजनेचा लाभ राज्यातील अनेक शेतकरी, शेतमजूर व सर्वधर्मीय नागरिकांना होत आहे. राज्य शासनाचा हा क्रांतीकारी निर्णय आहे. छत्रपती संभाजीनगर ते प्रभू श्री रामांची जन्मभूमी आयोध्या या तीर्थयात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व ज्येष्ठांना रेल्वेत सर्व सोई देण्यात आल्या आहेत असे सांगून त्यांनी यात्रेकरूंचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

स्वागताने जेष्ठ भारावले- भगव्या पतका, फेटे, टोप्या, उपरणे परिधान केलेल्या प्रवाशांचे फुलांची उधळण व झेंडूच्या फुलांचे हार घालून रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले. अयोध्येला जाणारी विशेष रेल्वे फुलांच्या माळा आणि फुगे बांधून सजविण्यात आली होती. रेल्वे स्थानकावर आगमन होताच केलेले स्वागत पाहून जेष्ठ नागरिक भारावून गेले. अनेकांनी आयुष्यात पहिल्यांदाच अयोध्येला जात असल्याचे सांगत आनंद व्यक्त केला.

रेल्वेत वैद्यकीय सुविधांची उपलब्धता- तीर्थयात्रेत सहभागी ज्येष्ठांसाठी रेल्वेत औषध, वैद्यकीय सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. जेष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी सामाजिक न्याय विभागाचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

भक्तांच्या नवसाला पावणारी गोळेगावची तारादेवी

गोळेगाव - सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव येथील गोळेगावच्या बसस्थानकावरुन गावात प्रवेश करताना समोरच असलेले श्री तारादेवीचे भव्य नवीन बांधकाम केलेले मंदिराचे दर्शन होते.भक्ताची श्रध्दा दृढ असेल तर तारादेवी भक्तांच्या सतत पाठीशी उभी असते. याच विश्वासाने महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातुन भक्त गोळेगाव येथील तारादेवीच्या दर्शनास येतात. नवरात्रोत्सवादरम्यान मंदिर परीसरास यात्रेचे स्वरूप येते.भक्तांच्या हाकेला साद देणे हा मातेचा स्वभाव असल्याणे अणेक भक्त मातेच्या दर्शनासाठी व नवस मातेच्या चरणी अर्पण करण्यासाठी गोळेगावच्या तारादेवीच्या मंदिरात येतात. भक्तारे संकट हरण्यासाठी देवी सतत कार्यशील असते. सिल्लोड तालुक्यातील गोळेगाव येथे छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर हे मंदिर आहे.मंदिराचे बांधकाम भक्तांना आकर्शीत करेल असे आहे. मंदिरासमोर भव्य असे मनोरे असुन त्या दोन मनोर्यांवर भक्तगण नीवांतपणे आसरा घेतात.

या मंदिरासमोर श्री गजानन महाराजांचे सुद्धा आकर्शक व भव्य असे मंदिर आहे. नवरात्रोत्सवादरम्यान तारादेवी मंदिर कमीटी व संपूर्ण गावातुन दररोज देवीच्या आरतीला पुरुष व महिलांची मोठ्या संख्येने गदी असते मंदिर रंगरंगोटी .विघुत रोषणाई ने मंदिर . गावकर्यांकडुन मंदीर परीसरात वीवीध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

जाहिर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री. शेख आयजोद्दीन मोईनोद्दीन मुज्जावर रा. रो. हाऊस क्र. २७/१/३ मोहल्ला छोटी गुंमबाद खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर यांची छत्रपती संभाजीनगर वनविभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी खुलताबाद यांचे कार्यक्षेत्रातील मौ. खुलताबाद येथील सर्व्हे नं.४४ प्लॉट नं. २८ येथील अम्मार सॉमील या आरगिरणीचे स्थलांतर स्वतःच्या मालकीच्या जागेमध्ये मौ. खुलताबाद सर्व्हे क्र.४५/२ ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर मध्ये होणार आहे. सदर सॉमील च्या स्थलांतरास काही उजर अथवा आक्षेप असल्या हे जाहिरप्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह उप वनसंरक्षक, वनविभाग छत्रपती संभाजीनगर, वनभवन, उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर अथवा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. खुलताबाद यांचे पत्त्यावर सादर करावे विहीत मुदतीत उजर हक्क/आक्षेप वरील पत्त्यावर प्राप्त झाले नाही तर नियमानुसार सदर सॉमीलचे मौ. खुलताबाद सर्व्हे क्र. ४५/२ येथे स्थलांतराची कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती सुवर्णा माने) भा.व.से.
उप वनसंरक्षक, (प्रा.)
छत्रपती संभाजीनगर वनविभाग
छत्रपती संभाजीनगर
जा.क्र.जिमाका/छ.संन/जाहि २४२/२०२४-२०२५

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 03/10/2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1)दीपक गोविंदाप्पा वैद्य 2)जयश्री दीपक वैद्य	**अनुसूची -I** अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : रो हाऊस क्र. 2 अधिमापन (38.50 चौरस मीटर) चटई क्षेत्रफळ 28.48 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्रफळ 34.66 चौरस मीटर आणि सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ 38.25 चौरस मीटर सोबत आरसीसी, ''युनायटेड आरंभ पार्ट-2'' नावाच्या प्रकल्पामध्ये स्थित, प्लॉट क्र. 15 वर बांधलेले, गट क्र. 90, गंगापुर जहांगीर, जि. औरंगाबाद महाराष्ट्र 431007. सीमारेषा: पूर्व - रो हाऊस क्र. 3, प्लॉट क्र. 16; पश्चिम - रो हाऊस क्र. 1, प्लॉट क्र. 14; उत्तर - प्लॉट क्र. 28; दक्षिण - 9.00 मीटर रुंद रस्ता	AURHL19000138 & AURHL19000140	21/08/2024	रु. 86,832/-	रु. 33,18,331.95	रु. 8,68,320/-	सर्व कामकाजांच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पूर्वनियोजित भेटीसह.	14/11/2024 दुपारी 12 ते दुपारी 2.00
	अनुसूची -II अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : रो हाऊस क्र. 3 अधिमापन (38.50 चौरस मीटर) चटई क्षेत्रफळ 28.48 चौरस मीटर, बांधकाम क्षेत्रफळ 34.66 चौरस मीटर आणि सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ 38.25 चौरस मीटर सोबत आरसीसी, ''युनायटेड आरंभ पार्ट-2'' नावाच्या प्रकल्पामध्ये स्थित, प्लॉट क्र. 16 वर बांधलेले, गट क्र. 90, गंगापुर जहांगीर, जि. औरंगाबाद महाराष्ट्र 431007. सीमारेषा: पूर्व - रो हाऊस क्र. 3, प्लॉट क्र. 17; पश्चिम - रो हाऊस क्र. 1, प्लॉट क्र. 15; उत्तर - प्लॉट क्र. 27; दक्षिण - 9.00 मीटर रुंद रस्ता			रु. 84,420/-		रु. 8,44,200/-		

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **13/11/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या **10%** परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **14/11/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **15/11/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे **नाव : शेखर काळे, संपर्क क्र. 9823271111, एल&टी फायनान्स लि. - एल&टी फायनान्स लि. 1ला मजला, रत्नप्रभा कॉम्प्लेक्स, जालना रोड, औरंगाबाद - 431001 आणि संतोष तिवारी, संपर्क क्र. 9920490126, एल अँड टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 07.10.2024
ठिकाण: औरंगाबाद

Printed at Anand nagari prakashan pvt. ltd. A/14, additional M.I.D.C., Jalna & published by Ravindra Mishrilal Bangad on behalf of Anand nagari prakashan pvt. ltd. at Jyotimarya Complex, Block no. 5 & 32 Jalna road, Aurangabad (Maharashtra). Tel.: (0240) 2483911, Fax: 2481910, Editor: Ravindra Mishrilal Bangad*. (*Responsible for selection of news under P & RB act.). Jalna 13th year. E-mail: anandnagri@gmail.com. (All desputes under Jalna jurisdiction). It is not necessary to the editorial board that they agree with the opinions expressed through matter and articles published in this newspaper. RNI no. MAHMAR/2012/26780.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक आणि संपादक रवींद्र मिश्रीलाल बांगड* यांनी आनंद नगरी प्रकाशन प्रा.लि. ए/१४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., जालना येथे छापून कार्यालय ज्योतिर्मय कॉम्प्लेक्स गाळा क्रं. ५ व ३२ जालना रोड औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. फोन नं. ०२४०-२४८१८०९, २४८३९११ फॅक्स २४८१९१० औरंगाबाद वर्ष १३वे. (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे). ई मेल : anandnagri@gmail.com (सर्व वाद जालना न्यायालयाअंतर्गत) या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकूर व लेख या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. आरएनआय नं.एमएएचएमएआर/२०१२/२६७८०